महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : eooandm@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.४/१०१५०

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३

दिनांक : ३१.०३.२०११

# परिपत्रक

विषयः मुख्य कार्यालयास अनावश्यक पत्र व्यवहाराच्या प्रती अग्रेषित न करण्याबाबत.

---------

असे निदर्शनास आले आहे की, क्षेत्रीय कार्यालयांमधील उप विभाग, विभाग, प्रविभाग इत्यादी कार्यालयामार्फत अंतर्गत पत्र व्यवहार केला जातो. त्या पत्रांच्या प्रती मुख्य कार्यालयास आवश्यक नसतांना सुध्दा पाठविल्या जातात. त्यात मनुष्यबळ, लेखनसामग्री व कार्यालयीन वेळेचा अपव्यय होतो.

तसेच असेही निदर्शनास आले आहे की, परिमंडळार्गत/परिमंडळाबाहेरील बदली, पदस्थापना इत्यादी कार्यालयीन आदेशाच्या प्रती निगम कार्यालयातील सर्व अधिकाऱ्यांना अग्रेषित केल्या जातात. या संदर्भात असे निर्देशीत करण्यात येते की, सदर आदेशांच्या प्रती संबंधीत साप्रवि/तांत्रिक- आस्थापना विभागातील विभागप्रमुख /भविष्य निर्वाह निधी/ शिस्तभंग नियंत्रण विभाग/संपादनुक मुल्याकंन कक्ष या विभागास 'ई ' मेल द्वारे पाठविण्यात याव्यात व लेखनसामग्री व वेळेचा अपव्यय टाळण्यात यावा.

२. या पुढे मुख्य कार्यालयास अनावश्यक पत्र व्यवहाराच्या प्रती अग्रेषित करणे टाळावे. त्याचप्रमाणे मुख्य कार्यालयास पत्रव्यवहार करतांना परिमंडल कार्यालयाकडून प्रथम मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानंतरच सदर प्रकरण निगम कार्यालयाकडे आवश्यकता असल्यास, मार्गदर्शनास्तव पाठविण्यात यावे. वरील सूचनांचे पालन यथाशिघ्र काटेकोरपणे करण्यात यावे.

३. सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रति
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे